N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

## FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** खडक

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0497 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**26/09/2025 18:03

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 19/09/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 25/09/2025

**Time From (वेळेपासून):** 08:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 19:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 26/09/2025 **Time (वेळ):** 18:03 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 017

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/09/2025 18:03 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसलिदार कार्यालय कचेरी हवेली , येथील पाठीमागील बाजुचे ,पत्र्याचे गेट जवळील रोडवर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शैलजा शशिकांत शिंदे
(b) **Guardian's Name (पालक चे नाव) :** शशिकांत शिंदे
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-7722011255

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शारदादेवी पुरुषोत्तम पाटील | | पालक का नाम : पुरुषोत्तम पाटील | 1. सर्वे नं57/1, कष्णकुंज सोसा, यटी मोरे वस्ती सोलापुर रोड , मांजरी बुद्रुक पुणे,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | प्रेरणा विनंदकुमार पारधी | | पालक का नाम : विनंदकुमार पारधी | 1. फ्लँट नं7 एस 2/4ए, जी सोसायटी,गुलमोहर पार्क जवळ, पाषाण पुणे,चतु:श्रृंगी ,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |



Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | दिपाली दिलीप पासलकर | | पत्नी का नाम : दिलीप पासलकर | 1. लेन नं4, स्वामी समर्थ नगर, , कोंढवा काकडे नगर पुणे-48,, कोंढवा,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

फिर्यादीने फिर्याद देताच तात्काळ दाखल

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | स्विकारलेली रक्कम | 2,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 26/09/2025.
मी शैलजा शशिकांत शिंदे वय -39 वर्षे, व्यवसाय – नोकरी, पद – पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे. मो.क्र 7722011255.

मी वरिल प्रमाणे असुन दिनांक 18/09/2025 रोजी आम्ही ला.प्र.वि.कार्यालयातील आमचे कक्षामध्ये असताना 17:00 वाजताचे सुमारास आमचे वरिष्ठ मा.सहायक पोलीस आयुक्त,(प्रशासन) श्री.दयानंद गावडे सर यांनी आम्हाला त्याचे कार्यालयात बोलावुन कळविले की त्यांचे समोर बसलेले तक्रारदार प्रसाद उध्दव शिरसाट वय -42 वर्षे, व्यवसाय – जमिन खरेदी विक्री रा. फलॅट नं.4 अमेय रेसीडन्सी, छत्रपती शिवाजी महारात पुतळ्या शेजारी, कोथरुड, पुणे. असे असून त्यांची लोकसेवकाविरूध्द लाच मागणीची तक्रार आहे. तरी तुम्ही त्यांची सविस्तर तक्रार घेऊन पुढील कारवाई करा असे लेखी आदेश दिले. तसेच सदर कारवाईकामी मदतीकरीता, पोशि/9843 महामुलकर, म.पो.अं.7934 वैशाली माकर ,शासकीय वाहन टाटा सुमो एम.एच.12 एन.यू.5882 वरील चालक सहा. पोलीस उप निरीक्षक श्री अविनाश चव्हाण असे घेण्यास सांगीतले. तसेच मा.सहायक पोलीस आयुक्त,(प्रशासन) श्री.दयानंद गावडे यांनी ला.प्र.वि.च्या इतर गोपनिय कामाकरीता कार्यालयात उपलब्ध असणारे पंच साक्षीदार श्री संजय गुलाब आसवले, वय 44 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- कनिष्ठ लिपीक, कृषी आयुक्तालय, पुणे व श्रीमती सुजाता एकनाथ कडू, वय -35 वर्षे, पद- कनिष्ठ लिपीक, लेखा परिक्षण पथक , पुणे असे दोन पंच गोपनिय कारवाईकामी उपलब्ध करुन दिले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना आमचे कक्षामध्ये घेवून आलो. सोबत पंच साक्षीदार हे आमचे कार्यालयात हजर झाले व त्यावेळी आम्ही पंच साक्षीदार व तक्रारदार यांची एकमेकांसोबत ओळख करुन दिली व ओळख करुन घेतली. तसेच पंचाना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांची नावे अनुक्रमे 1) श्री.संजय गुलाब आसवले, वय 44 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- कनिष्ठ लिपीक, कृषी आयुक्तालय पुणे 5 राहणार ठिकाण- एलआयजी कॉलनी, सेक्टर 25, सिंधु नगर, निगडी प्राधिकरण, पुणे मोबाईल नंबर 8275451567, 2) श्रीमती सुजाता एकनाथ कडू, वय 35 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद- कनिष्ठ लिपीक, लेखा अधिकारी - लेखा परिक्षण पथक पुणे. राहणार ठिकाण - फ्लॅट नं. 104, माऊली आंगण, कुराडे वस्ती आळंदी, पुणे मोबाईल नंबर 8208553072 अशी सांगितली. त्यावेळी सदर कारवाईकामी मदतीकरीता देण्यात आलेले पोशि/9843 महामुलकर, म.पो.अं.7934 वैशाली माकर तसेच शासकीय वाहन टाटा सुमो एम.एच.12 एन.यू.5882 वरील चालक सहा.पो.फौ श्री अविनाश चव्हाण हे आमचे कक्षामध्ये उपस्थित झाले. त्यावेळी आम्ही दोन्ही पंचांना आमची,



Scanned with CamScanner

तक्रारदार व स्टाफची ओळख करुन दिली तसेच आम्ही ओळख करुन घेतली. पंच साक्षीदार यांना यापूर्वी सापळा पथकामध्ये काम केलेबाबत विचारले असता त्यांनी सापळा पथकामध्ये पूर्वी काम केले नसलेबाबत सांगितले. तक्रारदार यांनी त्यांचे तक्रारीबद्दल विचारणा केली असता त्यांनी थोडक्यात हकिकत सांगुन लेखी तक्रार देण्यासाठी दिनांक 19/09/2025 रोजी सकाळी येतो असे सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांची तक्रार दिनांक 19/09/2025 रोजी सकाळी 8/00 वाजता कार्यालयात हजर झाल्यावर त्यांचे हस्ताक्षरात लिहुन घेण्याचे सर्वानुमते ठरले. त्याप्रमाणे वरील नमुद दोन्ही पंच साक्षीदार तसेच पडताळणी कारवाईकामी देण्यात आलेले सापळा पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक 19/09/2025 रोजी सकाळी 08/00 वाजता कार्यालयात हजर राहण्याबाबत सुचना देऊन गोपनिय कारवाईबाबत कोठेही वाच्यता न करण्याबाबत सर्वांना सांगण्यात आले. दिलेल्या सुचनांप्रमाणे दिनांक 19/09/2025 रोजी सकाळी 08/50 वाजता तक्रारदार प्रसाद शिरसाट, वरिल नमुद दोन्ही पंच साक्षीदार व सापळा पथक ला.प्र.वि.कार्यालय येथे हजर झाले. त्यावेळी तक्रारदार यांनी पंच साक्षीदारां समक्ष दिनांक 18/09/2025 रोजी सांगितलेली तोंडी तक्रार त्यांचे हस्ताक्षरात लिहुन दिली ती खालीलप्रमाणे.

"मी अर्जदार प्रसाद उध्दव शिरसाट वय -42 वर्षे, व्यवसाय - जमिन खरेदी विक्री, रा. फ्लँट नं.4 अमेय रेसीडन्सी, छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या शेजारी, कोथरुड पुणे 38 मो.क्र. 9970789979 असुन माझा कोथरुड येथे सन 2001 पासुन वामन रिअल इस्टेट नावाचा जमिन खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. या करीता मी आजुबाजुच्या माहितीतील जमिनींची शासकीय कागदपत्रे मिळवुन त्या संबंधीत गुंतवणुकदारांना माहिती देऊन सदर जमिनींच्या होणा-या खरेदी विक्रीतुन मिळणा-या नफयावर माझा व माझ्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह चालतो.

माझ्या माहितीतील रिंगरोडमध्ये गेलेल्या जमिनीला लागुन असलेल्या काही जमिनी या विक्रीसाठी उपलब्ध असल्याची माहिती मला मिळाली. सदर जमिनींच्या 7/12 व 8 अ च्या नकलांची ऑनलाईन माहिती उपलब्ध आहे. परंतु सदर प्रती या प्रमाणित नसल्याने त्याच्या सरकारी कामकाजासाठी वापर करता येत नसल्याने सदर प्रती या तलाठी यांच्या सही व शिक्कयांच्या सांक्षांकीत प्रती मिळण्याकरीता मी वर नमुद मौजे सांगरुन, बहुली, खडकवाडी येथील तलाठयांविषयी माहिती घेतली. तसेच त्यांना तहसिलदार कचेरी हवेली पुणे या ठिकाणी भेटुन संबंधीत कामाविषयी चौकशी केली ती खालीलप्रमाणे.

मी दिनांक 10/09/2025 रोजी सकाळी 09/45 वाजता माझे वर नमुद मोबाईलवरुन श्रीमती प्रेरणा पारधी यांना त्याचे मोबाईल क्रमांक 8390189413 यावर कॉल करुन मला हव्या असलेल्या सांगरुन रिंगरोडच्या जमिनींचे 7/12, 8 अ व फेरफार हवे असल्याबाबत सांगितले असता त्याच दिवशी संध्याकाळी 07/00 वाजता तहसिलदार कार्यालय हवेली पुणे आवारात असलेल्या तलाठी संघटना, पुणे 4 या ऑफीसमध्ये पारधी मॅडमनी भेटायला बोलविले तेथे गेल्यावर पारधी मॅडम यांनी त्यांना सांगितलेली रिंगरोड मध्ये गेलेले सांगरुन गावातील एकुण 76 सात बारा उतारे, 8 अ चे दोन उतारे व 10 फेरफार उतारे अशा एकुण 88 प्रती आहेत. त्याच्या सांक्षांकीत नकला देण्याकरीता शासकीय फी व्यतिरीक्त इतर खर्च मिळुन एकुण 5000/- रुपये दयावे लागतील. मी गेली 25 वर्षे सदर व्यवसाय करत असल्याने मला सध्या प्रत्येक नक्कल प्रतीची शासकीय फी ही 15 रुपये असुन सदर फी ही नक्कल प्रतीवर छापलेली असते याबाबत मला माहिती आहे. त्यानुसार 88 सांक्षाकीत नकलांचे रुपये 15/- प्रमाणे 1320/- रुपये शासकीय फी होते. उर्वरीत रक्कम 3680/- ही लाच असल्याचे माझ्या लक्षात आले. त्यापैकी शासकीय फी रक्कमेसह मी माझ्याकडे असलेले एकुण रुपये 4000/- हे श्रीमती प्रेरणा पारधी यांना तलाठी संघटना ऑफीसमध्ये त्याच दिवशी दिले. त्यावेळी त्यांनी मला रिंगरोड येथील जमिनीच्या 7/12 उता-याच्या संगणकीकृत प्रती काढुन त्यावर त्याच्या सही व शिक्का मारुन प्रमाणीत प्रती दिल्या. त्यावेळी मी त्यांना लेखी अर्ज आणला नसल्याचे सांगितले असता अर्ज नंतर दिला तरी चालेल असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना रिंगरोडमध्ये गेलेल्या जमिनीच्या उर्वरीत हस्तलिखीत 7/12 व फेरफार कागदपत्रांची मागणी केली असता त्यांनी त्या एकुण 106 नक्कल प्रती होत असुन .सांगरुन हस्तलिखीत 7/12 च्या 1992 ते 2015 असे एकुण सात बा-याच्या 152 प्रती असुन प्रत्येक पानास 40/- रुपये प्रमाणे किंवा प्रती 7/12 उता-यास 80/- रुपये प्रमाणे सदरच्या साक्षांकीत प्रती देण्याकरीता शासकीय फी मिळुन रुपये 12,000/- रक्कमेची मागणी केली. त्यापैकी 3870/- रुपये ही शासकीय फी असुन उर्वरीत 8130/- रुपये ही लाच रक्कम असल्याचे माझे लक्षात आले. तसेच सदर कामाबाबत एक माणुस नेमावा लागेल त्याचेही 1000/- रुपये अतिरीक्त दयावे लागतील असे सांगुन दिनांक 10/09/2025 रोजी दिलेल्या 7/12 उता-याच्या 88 नकलांचे 1000/- रुपये उरलेले आहेत तेही सोबत दया असे सांगुन एकुण 10130/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली. तसेच बहुली गावच्या तलाठी श्रीमती दिपाली पासलकर या माझ्या मैत्रिण असुन त्यांना सांगुन बहुली रिंगरोड जमिनीच्या 7/12, 8अ व फेरफार उता-याच्या 106 सांक्षाकीत नक्कला प्रती असल्याची मला माहिती असुन सदरच्या प्रतींची साक्षांकीत प्रत मी तुम्हाला देऊ



Scanned with CamScanner

शकते त्याकरीता सदर प्रतींची शासकीय फी सहीत 6500/- रुपये रक्कम होईल ती दयावी लागेल असे सांगितले. त्यामध्ये शासकीय फी 1590/- असुन उर्वरीत 4910/- रुपये लाच रक्कम असल्याचे माझे लक्षात आले. तसेच सदरची रक्कम ही पासलकर मॅडम यांनी पारधी मॅडम यांचेकडे देण्याबाबत पासलकर मॅडमचा निरोप असल्याचे सांगितले. त्यानंतर मी पारधी मॅडम यांना विनंती करुन पासलकर मॅडमचा मो.क्र. 7030909029 घेतला. त्यानंतर गाव खडकवाडी ता.हवेली जिल्हा पुणे. येथील तलाठी श्रीमती शारदादेवी पाटील यांची ओळख सांगुन त्यांचाही मोबाईल क्रमांक 9421618893 हा माझ्या व्हॉट्सअॅप नंबर वर पारधी मॅडम यांनी पाठवुन दिला.

दिनांक 17/09/2025 रोजी मी पासलकर मॅडम यांना त्यांचे मोबाईल क्रंमांक 7030909029 यावर फोन केला असता, त्यावेळी मी त्यांना पारधी मॅडम यांनी बहुली रिंगरोड जमिनीच्या 7/12, 8अ व फेरफार उता-याच्या 106 सांक्षाकीत नक्कला प्रती तयार केल्या असुन त्यांची शासकीय फी सहीत 6500/- रुपये रक्कम ही पारधी मॅडम यांनी त्यांचेकडे देण्याबाबत सांगितले.

दिनांक 11/09/2025 रोजी मी शारदादेवी पाटील मॅडम यांना त्यांच्या नमुद क्रमांकावर फोन करुन मला हव्या असलेल्या गाव खडकवाडी ता.हवेली जिल्हा पुणे येथील रिंगरोड जमिनींच्या 7/12 व 8 अ उता-याच्या साक्षांकीत नक्कल प्रतीची विचारणा केली असता त्यांनी संध्याकाळी 7/30 वाजता हवेली तहसिलदार कार्यालय पुणे येथे बोलविले. वरील नमुद गटांच्या 7/12 च्या 16 उता-याच्या साक्षांकीत नक्कल प्रती देवुन 1500/- रुपयांची मागणी केली. त्याप्रमाणे मी त्यांना सदर रक्कम देवु केली. त्यापैकी साक्षांकीत नक्कलांची शासकीय फी ही 15/- रुपये प्रत प्रमाणे असुन त्यांचे एकुण 240/- रुपये होतात. उर्वरीत 1260/- रुपये ही लाच रक्कम असल्याचे माझे लक्षात आले. दिनाक 13/09/2025 रोजी सकाळी 10/00 वाजताचे सुमारास पाटील मॅडम यांना खडकवाडीच्या जमिनीच्या उर्वरीत 8 अ च्या साक्षांकीत नक्कल प्रत व 7/12 च्या हस्तलिखीत प्रती घेण्याकरीता कधी भेटु असे विचारण्याकरीता कॉल केले असता त्यांनी माझे कॉल उचलले नाहीत. त्यांतर 10/19 वाजता त्यांचा स्वत:हुन मला फोन आला व मला त्यांनी , दुपारी 03/00 वाजता हवेली तहसिलदार कचेरी,पुणे येथे भेटायला बोलविले परंतु त्या त्यादिवशी भेटल्या नाहीत. दिनांक 14/09/2025 रोजी दुपारी 02/37 मिनीटंानी त्यांंना व्हॉट्सअॅपवर कॉल करुन उर्वरीत 8 अ तसेच पुर्वी दिलेल्या 7/12 च्या 16 उता-याच्या आणखी एक साक्षांकीत प्रत तसेच सन 2000 ते सन 2016 या कालावधीतील तलाठी कार्यालयात उपलब्ध असणा-या 7/12 च्या हस्तलीख्ीत साक्षांकीत नक्कल प्रती देण्याकरीता विचारणा केली असता, श्रीमती शारदा पाटील यांनी शासकीय फी सहीत 2000/- रुपयांची मागणी केली. नमुद हस्तलिखीत 16 गटांच्या 7/12 नकलांची साक्षांकीत प्रतींची शासकीय फी ही 240/- रुपये होते. म्हणजेच त्यांनी 1760/- रुपये लाचेची मागणी केली आहे.

तरी मला 1) श्रीमती प्रेरणा विनंदकुमार पारधी, पद - तलाठी, सांगरुण हस्तलिखीत 7/12 च्या 1992 ते 2015 असे एकुण सात बा-याच्या 152 प्रती देण्याकरीता शासकीय फी मिळुन रुपये 12,000/- रक्कमेची मागणी केली. त्यापैकी 3870/- रुपये ही शासकीय फी असुन उर्वरीत 8130/- रुपये ही लाच रक्कम तसेच सदर कामाबाबत एक माणुस नेमणेकरीता 1000/- रुपये अतिरीक्त तसेच दिनांक 10/09/2025 रोजी दिलेल्या 7/12 उता-याच्या 88 नकलांचे 1000/- रुपये असे सांगुन एकुण 14000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली. तसेच पासलकर मॅडम यांचेकडील 106 साक्षांकीत नक्कला प्रती 7/12 उता-याची शासकीय फी सह 6500/- रुपये त्यामध्ये शासकीय फी 1590/- रुपये व लाच रक्कम 4910/- रुपये लाच रक्कम अशी एकुण 20500/- रुपयांची शासकीय फी सहीत लाच मागणी केली. तसेच 2) श्रीमती शारदादेवी पुरुषोत्तम पाटील पद - तलाठी कुडजे, ता.हवेली जिल्हा पुणे. यांनी खडकवाडी कुडजे या गावच्या 7/12 उता-याच्या हस्तलिखीत 16 गटांच्या प्रती देण्याकरीता शासकीय फी सह 2000/- रुपयांची लाच मागणी केली आहे. तसेच 3) श्रीमती दिपाली पासलकर, पद तलाठी - बहुली, ता.हवेली जि.पुणे यांनी बहुली रिंगरोड जमिनीच्या 7/12, 8अ व फेरफार उता-याच्या 106 सांक्षाकीत नक्कला प्रतींचे शासकीय फी 1590/- रुपये व लाच रक्कम 5910/- रुपये अशी शासकीय फी सह एकुण 6500/- रुपये अशी लाच मागणी करुन सदरची लाच रक्कम ही पासलकर मॅडम यांनी पारधी मॅडम यांचेकडे देण्याबाबत सांगितले आहे. सदर लाच रक्कम दयावयाची माझी इच्छा नसल्याने मी आज रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे श्रीमती प्रेरणा पारधी ,तलाठी सांगरुन, ता.हवेली जि.पुणे, श्रीमती शारदादेवी पाटील तलाठी गाव खडकवाडी कडुज ता.हवेली जि.पुणे व श्रीमती दिपाली पासलकर तलाठी बहुली ता.हवेली जि. पुणे. यांच्या विरोधात लाचेच्या मागणीबाबत तक्रार देत असुन त्यांच्याशी माझे कोणतेही वैमनस्य नसुन यापुर्वी माझे त्यांचेबरोबरोबर कोणतेही आर्थिक व्यवहार नाहीत. तरी पारधी मॅडम व पाटील मॅडम व पासलकर मॅडम यांच्यावरती आपल्या विभागामार्फत योग्य ती कायदेशीर कारवाई व्हावी", असा तक्रारदार शिरसाट यांनी दिनांक 19/09/2025 रोजी 9.00 वा. लेखी तक्रार अर्ज दिला. नमूद पंचांना गोपनीय कामासाठी हजर राहण्याबाबत विचारणा करता त्यांनी त्यास संमती दिली. त्यानंतर तक्रारदार यांना त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन दिलेली तक्रार पंच



Scanned with CamScanner

साक्षीदार यांना तोंडी सांगण्यास सांगीतली. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांची तक्रार दोन्ही पंचासमक्ष तोंडी सांगीतली व तक्रारदार यांनी लिहलेली तक्रार पंचांना वाचण्याकरीता देण्यात आली, तक्रारदार यांनी सांगीतलेली तक्रार व आज रोजी लाप्रवि पुणे कार्यालयात नोंदविलेली तक्रार सारखीच असल्याने सदर तक्रारीवर आम्ही समक्ष म्हणुन व पंचानी पंच साक्षीदार म्हणून सहया केल्या.

त्यानंतर आम्ही त्याच दिवशी 19/09/2025 रोजी तक्रारदार आणि दोन्ही पंचांना सांगितले की, तक्रारदार प्रसाद उध्दव शिरसाट यांनी नोंदविलेल्या लाचेच्या तक्रारीच्या अनुषंगाने, श्रीमती प्रेरणा पारधी ,तलाठी सांगरुन, ता.हवेली जि.पुणे, श्रीमती शारदादेवी पाटील तलाठी गाव खडकवाडी व कुडजे ता.हवेली जि.पुणे व श्रीमती दिपाली पासलकर तलाठी बहुली ता.हवेली जि.पुणे यांना फोन करुन त्यांचे 7/12, 8 अ व फेरफार उता-यासंदर्भाने चर्चा करणार असुन त्यावेळी वरील नमुद लोकसेवक हया तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत तक्रारदाराच्या मोबाईल फोनवरुन तिनही लोकसेविका यांना फोन करुन लाचेची पडताळणी करण्यात येणार असून, लाचेची मागणी झाल्यास पुढील सापळा कारवाई करणार असल्याचे कळविले. त्यादरम्यान त्यंाचेत होणारे संभाषण शासकीय व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असुन लोकसेवकांनी फोन न उचलल्यास सदर लाच पडताळणी ही त्यांचे कार्यालय हवेली तहसिलदार कार्यालय पुणे येथे किंंवा लोकसेवक ज्या ठिकाणी बोलवतील त्या ठिकाणी जाऊन करण्याचे ठरविण्यात आले. त्यासाठी आपण पंच साक्षीदार म्हणून समक्ष हजर रहा असे त्यांना सांगितले. त्यास त्यांनी संमती दिली. सदर वेळी नमुद कारवाईकामी पंच क्र.1 म्हणुन श्री संजय गुलाब आसवले व पंच क्र. 2 म्हणून श्रीमती सुजाता एकनाथ कडु यांनी काम करण्याचे ठरवुन पुढील पडताळणी कार्यवाही ही लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय पुणे येथील आमचे ऑफीसमधुन करण्याचे ठरले. तत्पुर्वी पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे शासकीय साहीत्य शासकीय लॅपटॉप, अल्ट्रा व्हायोलेट बॅटरी, प्रिंटर, काळेपडदे, अॅन्थ्रासिन पावडर, मेमरी कार्ड, व्हाईस रेकॉर्डर, स्टेशनरी साहित्य व इतर साहित्य सोबत घेण्यात आले. तद्नंतर आमचेकडील शासकीय व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार व पंचाना दाखवून त्याची त्यांना थोडक्यात माहिती देऊन, लाचेच्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार आणि लोकसेवक यांच्यामध्ये होणारे फोनवरील संभाषण व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत होणार असल्याचे सांगितले. सदर व्हॉईस रेकॉर्डर आम्ही चालू करुन, त्यामध्ये आमचे कडील नविन सॅनडिस्क अल्ट्रा कंपनीचे 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी. यु.1 एक्स.सी. आय सी. 10 ए 1 कार्ड त्याचेमागील बाजुस 4525ज्र्क्र1822ज्ञ्घ् एग् ग्ऋक्क क्ष्ग् क्तक्ष्ग्रऋ असे हे मेमरी कार्ड पंचांसमक्ष फोडून व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच यांना व्हाईस रेकॉर्डरमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल रेकॉर्ड नसल्याची खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही प्रथम तक्रारदार प्रसाद शिरसाट यांचे व त्यानंतर पंच नं. 1 श्री संजय गुलाब आसवलेव पंच क्र.2 श्रीमती सुजाता एकनाथ कडू यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन 11.43 वा. ध्वनिमुद्रीत केले. सदरचे निवेदन घेऊन 11/53 वाजता व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.

तक्रारदार यांनी तीन लोकसेवकांविरुध्द तक्रार केली असल्यामुळे तसेच त्यांचे ऑफीस वेगवेगळया ठिकाणी असल्या कारणाने तक्रारदार यांनी पडताळणी कारवाई करीता त्यांचे स्वत:चे मोबाईल फोनवरुन लोकसेवक यांचे मोबाईल फोनवर फोन करुन त्यांचे कामासंदर्भाने बोलणी करुन लाचेच्या मागणी बाबत पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर पडताळणी कारवाईवेळी तक्रारदार व लोकसेवक यंाचेतील फोनवरील संभाषण शासकीय व्हाईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत करण्यात येणार असलेबाबत पंचांना व तक्रारदार यांना कळविण्यात आले. तसेच लोकसेवकांनी फोन न उचलल्यास सदर लाच मागणी पडताळणी ही लोकसेवक यांचे कार्यालय हवेली तहसिलदार कार्यालय, पुणे येथे जाऊन करण्याचे किंवा लोकसेवकांनी फोनवर सांगितले तर ते ज्या ठिकाणी बोलवतील त्या ठिकाणी जाऊन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याप्रमाणे तक्रारदार व पंच साक्षीदार व सापळा पथक यांना सुचना देण्यात आल्या.

त्यानंतर 11/55 वाजता आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचा शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु केला व तो तक्रारदार यांचे फोन शेजारी ठेवला त्यांनतर तक्रारदार प्रसाद शिरसाट यानी प्रथम लोकसेवक श्रीमती प्रेरणा पारधी, तलाठी सांगरुन सजा यांना तक्रारदार यांचे मो.क्र. 9970789979 यावरुन श्रीमती प्रेरणा पारधी यांना त्यांचे मो.क्र. 8390189413 यावर व्हॉट्सअॅप कॉल केला त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर सुरु करण्यात आले व केलेल्या संभाषणामध्ये खालीलप्रमाणे लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 12/14 वाजता बंद करण्यात आले.

संभाषणादरम्यान तक्रारदार लोकसेविका पारधी यांना विचारतात "मग मी तुमाला मग मी तुमाला राऊंड फिगर आज मॅडम मी वीस दिले तुमाला तर चालेल ना वीस हजार .."त्यावेळी श्रीमती पारधी "अं.. बर ठिके चालेल"अस म्हणतात. पुन्हा तक्रारदार " हा.. कारण की किती जास्त फरक नाय..ना राऊंड फिगर म्हणतोय मी वीस हजार"असे म्हणतात. त्यावेळी पारधी "हो हो.. ठिके ते आठशे एक्स्ट्रा होतातेत पण जाऊदे आता चला"असे म्हणतात. तेव्हा



Scanned with CamScanner

तक्रारदार "किती किती.. एक्स्ट्रा होतात मला सांगा" असे म्हणतात. तेव्हा "ऐट सिक्स्टी एक्स्ट्रा होतातेत त्याच्यात"असे पारधी सांगतात. त्यावेळी तक्रारदार "अं..एक मिन्ट मला कळल नाई किती म्हणले तुम्ही टोटल" असे म्हणतात. तेव्हा मॅडम "ऐट सिक्स्टी"असे सांगतात. त्यावेळी तक्रारदार पुन्हा "ऐट सिक्स्टी आठशे साठ"असे म्हणतात तेव्हा पारधी मॅडम"हो"म्हणुन सांगतात. त्यावर तक्रारदार "म्हणजे वीस हजार आठशे साठ टोटल"असे मॅडमना विचारतात. तेव्हा पारधी मॅडम " हो हो" म्हणतात. तेव्हा तक्रारदार "ठिके पण मग हयाच्यात मॅडम मं हयाच्याव्यतीरिक्त काय दयायच नाय ना शासकीय फी सहीते ना आपल्याला हे"असे मॅडमना विचारतात तेव्हा मॅडम "हो हो" म्हणतात. तेव्हा पारधी म्हणतात"तुमचा अर्ज घेऊन या फक्त दोनीचा पण आणा बहुलीचा वेगळा आणा सांगरुणचा वेगळा आणा.. आणि जो सांगरुणचा करणारे तो तुमी एकत्र करा हे आहे म्हणजे रिंगरोडचे सर्व अं हस्तलीखीतचे आणि ऑनलाईनचे"तेव्हा तक्रारदार "असा तो एकच अर्ज करु"असे विचारतात.तेव्हा मॅडम "हा याया सालापासुनचे" असे म्हणतात. तेव्हा तक्रारदार "ठिके आणि बहुलीचा पण अर्ज मं त्यातच करु की बहुलीचा वेगळा करु"असेमॅडमना विचारतात. तेव्हा मॅडम "नाय बहुलीचा वेगळा करा ना मॅडमकड इनवर्ड होइल सर ते"असे म्हणतात.त्यावर तक्रारदार ठिके मग म्हणतात.

वरिल नमुद दोन पंचासमक्ष शासकीय व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत केलेल्या तक्रारदार व लोकसेविका पारधी यांच्या संभाषणात सांगरुन सजा च्या 7/12, 8 अ उता-यांच्या कामाचे 14000/- रुपये व लोकसेविका श्रीमती पासलकर मॅडम यांचे तर्फे बहुली 7/12, 8 अ उता-यांच्या कामाचे शासकीय फी सहीत 6500/- रुपये असे दोघींचे मिळुन श्रीमती पारधी मॅडम यांनी 20,860/- रुपयांची लाच मागणी करुन तडजोडी अंती 20,000/- रुपयांची लाच मागणी केल्याचे झालेल्या पडताळणी कारवाईवरुन निष्पन्न झाले.

तद्नंतर तक्रारदार कु.प्रसाद शिरसाट यानी त्यांचे मो.क्र. 9970789979 यावरुन लोकसेविका श्रीमती शारदादेवी पाटील, तलाठी खडकवाडी कुडजे सजा यांना त्यांचे मो.क्र. 9421618893 यावर दोन्ही पंचांसमक्ष 12/15 वाजता फोन केला त्यावेळी सदरच्या संभाषणामध्ये तक्रारदार व लोकसेवक श्रीमती पाटील यांचेमध्ये तक्रारदार यांचे कामाचे संदर्भाने चर्चा झाली परंतु लाचेच्या संदर्भने चर्चा झाली नाही. तसेच तक्रारदार यांनी पाटील यांना पुन्हा कॉल करुन त्यांचेशी कामासंदर्भाने चर्चा करण्याचे सर्वानूमते ठरले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी पाटील यांना वर नमुद 12/25 वा. फोन केला त्यावेळी व्हाइस रेकॉर्डर चालु करण्यात आले व 12/27 वा. बंद करण्यात आले. त्यावेळी त्याच्यामध्ये फोन संभाषण झाले त्यावेळी तक्रारदार हे लोकसेविका पाटील यांना म्हणाले की, "त्या दिवशी जे आपल्या हिथ जे.. पंचायत समिती च्या इथ ते घेतले 8 अ आणि 7/12 त्याज काय म्हणजे मला तस त्यानुसार तयारी करुन यायला.."तेव्हा लोकसेविका पाटील म्हणाल्या"हा त्याचे पण अॅड करुन घ्या.."तेव्हा तक्रारदार म्हणाले "किती करु अॅड त्याज." तेव्हा पाटील म्हणाल्या "तूम्हाल जे योग्य वाटेल ते करा.. आता.. स्कुटीवर हे मी.."त्यावेळी तक्रारदार म्हणतात, "नाही नाही, अस नाही, त्या दिवशी जे 1500/- रुपये.. ऑलरेडी दिलेले आहेत. फक्त आता हयाचे 2000/- रुपये सांगितलेले आहेत.. त्याज काय टेंशन नाही.. पण आता..किती दयायचे ते तुम्ही सांगा? मला आता काय टेंशन नाही.. माझ्याकडंन कमी नको जायला असं..नको.." त्यावेळी पाटील मॅडम म्हणतात "कमी जास्त नाही.. आपण डबल सेट दिलाय ना.. मग तेव्हढे करा.." तेव्हा तक्रारदार "हा..अच्छा.. म्हणजे किती करु परत 2000/-" असे म्हणतात. त्यावर लोकसेविका पाटील " हो" म्हणतात. तेव्हा तक्रारदार पुन्हा म्हणतात "हा..अच्छा.. म्हणजे किती करु परत 2000/- असे म्हणतात. तेव्हा लोकसेविका पाटील "हा" म्हणतात.

वरिल नमुद संभाषण दोन पंचासमक्ष शासकीय व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झाले असल्याने शासकीय व्हाईस रेकॉर्डर संभाषण आम्ही पुन्हा दोन पंचासमक्ष ऐकले असता त्यामध्ये सदरच्या संभाषणामध्ये तक्रारदार व लोकसेवक श्रीमती पाटील यांचेमध्ये तक्रारदार यांचे खडकवाडी कुडजे येथील 7/12, 8 अ उता-यांच्या कामाचे संदर्भाने चर्चा झाली त्यामध्ये लोकसेवक श्रीमती पाटील मॅडम यांनी तक्रारदार यांना 7/12, 8 अ चे 16 उतारे देण्याकरीता शासकीय फीसह 2000/- रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

तद्नंतर तक्रारदार प्रसाद शिरसाट यानी लोकसेविका श्रीमती दिपाली पासलकर, तलाठी बहुली सजा, पुणे यांना लाच मागणी पडताळणी करीता वर नमुद दोन्ही पंचांसमक्ष 12/53 वाजता तक्रारदार यांचे मो.क्र. 9970789979 यावरुन श्रीमती दिपाली पासलकर यांचे मो.क्र. 7030909029 यावर फोन केला, त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर सुरु करण्यात आले व लोकसेविका श्रीमती पासलकर यांनी तक्रारदार यांचेमध्ये फोनवर संभाषण झाले त्यावेळी लाच मागणी संदर्भात कोणतेही चर्चा झाली नाही. त्यानंतर लगेच पुन्हा 12/54 वाजता तक्रारदार यांनी पासलकर यांना वॉट्सअॅप कॉल केला त्यावेळी तक्रारदार व लोकसेविका श्रीमती दिपाली पासलकर यांचेमध्ये वॉट्सअप कॉलवर संभाषण झाले त्यामध्ये तक्रारदार यांनी लोकसेविका श्रीमती पासलकर यांना बहुलीच्या 106 सात बारा उता-यांचे शासकीय फी सह 6500/- रुपये रक्कम हि लोकसेविका पारधी यांनी त्यांचेकडे देण्याबाबत सांगितल्याबाबत



Scanned with CamScanner

श्रीमती पासलकर यांचेकडे विचारणा केली असता त्यावर लोकसेविका श्रीमती पासलकर यांनी सागितले की "नाही. नाही.. काय प्रॉब्लेम नाही त्या फ्रेंडच..हेत माझ्या काही हरकत नाही.. आमच झालय बोलण पण नाही काय प्रोब्लेम नाही चालल असे म्हणुन बहुलीच्या 7/12 च 6500/- रुपये लोकसेविका पारधी यांच्याकडे देण्याची सहमती दर्शविली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 12/56 वा. बंद करण्यात आले.

वरिल नमुद संभाषण दोन पंचासमक्ष शासकीय व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झाले असल्याने शासकीय व्हाईस रेकॉर्डर संभाषण आम्ही पुन्हा दोन पंचासमक्ष ऐकले असता त्यामध्ये सदरच्या संभाषणामध्ये तक्रारदार व लोकसेवक श्रीमती पासलकर यांचेमध्ये तक्रारदार यांचे बहुली गावच्या 7/12, 8 अ उता-यांच्या कामाचे संदर्भाने चर्चा झाली त्यामध्ये लोकसेवक श्रीमती दिपाली पासलकर यांनी तक्रारदार यांना 7/12, 8 अ उतारे देण्याकरीता 6500/- रुपये लाच मागणी करुन सदरची लाच रक्कम श्रीमती प्रेरणा पारधी यांचेकडे देण्याबाबत संमती दर्शवल्याचे निष्पन्न झाले.

तरी तक्रारदार यांनी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्रीमती प्रेरणा पारधी यांना पडताळणी कारवाई दरम्यान दोन्ही पंच साक्षीदारांसमक्ष फोन केला असता, तक्रारदार व लोकसेवक श्रीमती पारधी यांचेमध्ये फोनद्वारे लाचेसंबंधाने बोलणी झाली असुन त्यामध्ये श्रीमती पारधी यांनी तक्रारदार यांचेकडे 7/12,8अ व फेरफार उतारे देण्याकरीता श्रीमती पासलकर मॅडम यांचेकडील तक्रारदार यांचे 7/12, 8 अ उता-यांच्या कामाचे शासकीय फी सह 6500/- रुपये व त्यांचे स्वत:कडील 7/12, 8 अ उता-यांच्या कामाचे शासकीय फी सहीत 13,500/- रुपये असे दोघींचे मिळुन श्रीमती पारधी मॅडम यांनी 20,860/- रुपयांची लाच मागणी करुन तडजोडी अंती 20,000/- रुपयांची लाच मागणी केल्याचे झालेल्या पडताळणी कारवाईवरुन निष्पन्न झाले.

दिनांक 20/09/2025 ते दिनांक 22/09/2025 रोजी पर्यत तक्रारदार यांची लोकसेविका श्रीमती पारधी, श्रीमती पासलकर व श्रीमती पाटील यांचेसोबत तक्रारीच्या अनुषंगाने कोणतीही चर्चा झाली नाही.

त्यामुळे दि.23/09/2025 रोजी पुढील सापळापुर्व व सापळा कारवाई करीता लोकसेविका श्रीमती प्रेरणा पारधी, श्रीमती शारदादेवी पाटील व श्रीमती दिपाली पासलकर यांना दोन पंचासमक्ष फोन करण्याचे ठरले त्यानुसार व्हाईस रेकॉर्डर 18/21 वाजता सुरु करुन तक्रारदार कु.प्रसाद शिरसाट यानी लोकसेवक श्रीमती शारदादेवी पाटील मो.क्र. 9421618893 यावर फोन केला त्यावेळी त्यांच्या दोघांमध्ये फोनवर संभाषण झाले त्यावेळी तक्रारदार यांना लोकसेविका पाटील यांनी दिनांक 25/09/2025 रोजी 7/12 उतारे घेण्याकरीता बोलविले. त्यानंतर सदरचे व्हाईस रेकॉर्डर 18/24 वाजता बंद करण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार प्रसाद शिरसाट यांनी लोकसेविका श्रीमती प्रेरणा पारधीयांना 18/24 वाजता, 18/26 वाजता, 18/27 वाजता फोन कॉल केला परंतु लोकसेविका श्रीमती पारधी यांनी सदरचे फोन उचलले नाहीत. त्यानंतर तक्रारदार श्रीमती शारदादेवी पाटील यांना फोन करुन श्रीमती पारधी यांचेबाबत विचारणा केली. त्यावेळी सापळा पुर्व व सापळा पंचनाम्याच्या अनुषंगाने कोणतेही बोलणे झाले नाही. तसेच तक्रारदार यांनी सापळापुर्व कारवाई दरम्यान लोकसेवक श्रीमती प्रेरणा पारधी यांना फोन केला असता, तक्रारदार व लोकसेवक श्रीमती पारधी यांचेमध्ये फोनद्वारे बोलणे झाले परंतु श्रीमती पारधी यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम देण्याकरीता कोठे यायचे याबाबत सांगितले नाही. त्यामुळे पुढील सापळा पुर्व व सापळा कारवाई ही लोकसेविका श्रीमती प्रेरणा पारधी यांनी तक्रारदार यांना भेटण्याचे ठिकाण सांगितल्यानंतर तसेच श्रीमती शारदादेवी पाटील यांनी दिनांक 25/09/2025 रोजी भेटण्याचे सांगीतले असल्याने त्यादिवशी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

दिनांक 25/09/2025 रोजी तक्रारदार शिरसाट हे 16:00 वा. सुमारास ला.प्र.वि. कार्यालय येथे हजर झाले. त्यानंतर तक्रारदार यांना पुढील कारवाईबाबत पंचासमक्ष विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, लोकसेविका श्रीमती पाटील, श्रीमती पारधी आणि श्रीमती पासलकर या तहसील कार्यालय हवेली, पुणे येथे कार्यालयात हजर असल्याची माहिती मिळाली असुन आपण लोकसेविका श्रीमती पाटील यांनी आज रोजी बोलविले असल्याने त्यांना भेटुन त्यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देणार आहोत तसेच श्रीमती पासलकर यांनी त्यांनी मागणी केलेली लाच रक्कम ही लोकसेविका श्रीमती पारधी यांचेकडे देण्यास सांगितल्याने आणि लोकसेविका श्रीमती पारधी यांनी मागणी केलेली लाच रक्कम अशी दोन्ही मिळुन रु.20,000/- रक्कम श्रीमती पारधी यांना त्यांचे कार्यालयामध्ये देणार आहोत त्या अनुषंगाने सापळा कारवाईचे नियोजन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याप्रमाणे पुढील सापळा कारवाईबाबत आम्ही आमचे वरिष्ठ अधिकारी श्री गावडे सो यांना कळवून आणखी स्टाफ व शासकीय वाहनाची विनंती केली असता त्यांनी सपोआ माधुरी भोसले, पोनि रुपेश जाधव, मपोशि 2652/कोमल शेटे, मपोशि/10768 पुजा डेरे, पोहवा/1848 किरण शेलार, पोहवा/चंद्रकांत जाधव व शासकीय चारचाकी वाहन क्र.एम एच 12 एनयु 4105 व त्यावरिल चालक पोहवा/ प्रकाश तावरे असे अधिकारी व कर्मचारी आमचे मदतीस दिले. ते सर्वजन 17/25 वा. आमचे कक्षात हजर झाले. त्यानंतर मी सर्वांना आता पर्यंत झालेल्या कारवाईची माहिती देवून



Scanned with CamScanner

त्यांची तक्रारदार श्री शिरसाट व दोन्ही पंच साक्षीदार यांचेशी ओळख करून दिली. त्यानंतर तक्रारदार श्री. शिरसाट यांना लाच रकमेबाबत विचारणा करता त्यांनी त्यांच्या जवळील 22,000/- रुपये रोख रक्कम व चिज वस्तु स्वत: काढून आमचेसमोर हजर केल्या. त्यांचे जवळ आणखी पैसे व चिज वस्तु नसल्याची माझे सुचनेनुसार पोशि/ महामुलकर यांनी स्वत: तक्रारदार यांची अंगझडती घेवुन खात्री केली. त्यानंतर तक्रारदार यांनी लाच रक्कम रुपये 22,000/-(500/- रुपये दराच्या एकुण 44 नोटा) म्हणून दिल्या व त्यांच्या चिजवस्तु त्यांना पुन्हा त्यांचे ताब्यात दिल्या. त्यानंतर सदर नोटांचे क्रमांक पोशि माहामुलकर यांनी एका को-या कागदावर लिहले व त्यावर आम्ही व पंचांनी सह्या केल्या. सदर नोट नंबर लिहलेला कागद आम्ही पंच क्र.1 संजय आसवले यांचे ताब्यात दिला. तक्रारदार यांना कारवाईकामी हजर केलेली लाच रक्कम कुठुन आणली याबाबत विचारले असता त्यांनी त्यांचे बचतीमधून हजर केल्याचे पंचांसमक्ष सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांना एकुण लाच रु. 22,000/- पैकी किती लाच रक्कम लोकसेवक यांना देणार आहे अशी विचारणा करता तक्रारदार हे श्रीमती प्रेरणा पारधी यांना एकुण 13,500/- रु 2) श्रीमती दिपाली पासलकर यांना एकुण 6,500/- रू. 3) श्रीमती.शारदादेवी पाटील यांना 2,000/- रु असे एकुण रुपये 22,000/- यांना देणेकरीता पाठविण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच साक्षीदार यांना अल्ट्राव्हायलेट दिवा व अँथ्रासिन पावडर दाखवुन कार्यवाहीतील त्यांचे उपयोग व गुणधर्म सांगीतले.

सदर सापळा पुर्व कारवाई ही ला.प्र.वि.कार्यालयातुनच करण्यात येत असल्याने त्यावेळी कार्यालयात उपलब्ध असणारे पो.हवा.1952 चंद्रकात जाधव यांनी आमचे सांगणेवरुन लोकसेविकांना लाच रक्कम म्हणून देण्यासाठी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अँथ्रॉसिन पावडर लावली तसेच सदर नोटांचे तीन लोकसेविकांना देण्याकरीता तीन बंडल तयार केले. त्यापैकी लोकसेविका पाटील यांना दयावयाची लाच रुपये 2000/- (500 रुपये दराच्या 4 नोटा) त्याचे क्रमांक खालीलप्रमाणे
1 7 GB081297 , 2 6 EN 913529 ,3 4 NP 098279 ,4 6RD 859279
सदर रकमेच्या बंडलवर 'खडकवाडी' असे पेन्सिलने लिहुन तो बंडल तक्रारदार श्री.शिरसाट यांनी परिधान केलेल्या शर्टच्या डावे बाजुचे खिशामध्ये अलगद ठेवला.

तसेच लोकसेवक श्रीमती पासलकर यांना देण्यासाठी तायार केलेले 6500/- (500 रुपये दराच्या 13 नोटा) रकमेचे बंडल तयार केले त्यांचे नंबर खालील प्रमाणे
1 3 FG 303259 ,2 0 TE398329 ,3 9 FV 226432 ,4 1 NP 000549 ,5 1 TE
721753 ,1 KR 144702 ,72 MM 932453 ,8 3 KG 245236
9 4 AE 589201 ,10 9 UT 038797 ,11 GM 004799 ,12 9 ET 012999 ,13 8 WD
703652

त्यावर बहुली असे पेन्सिलने लिहले व श्रीमती.पारधी यांना देण्यात येणारी लाच रक्कम 13500/- (500 रुपये दराच्या 27 नोटा) रकमेचे बंडल तयार केले त्याचे क्रमांक खालिलप्रमाणे
1 5 SS 081401 ,2 5 KK 276838 ,3 3 AQ 096449 ,4 8 SC 856167 ,5 0 CH
250939 ,6 6 SH918179 ,7 9 TA 922486 ,8 0 FG 546300
9 7 GR318423 ,10 6 MB 690867 ,11 5 DA 150493 ,12 3 FD 334410 ,13 6 KV
577799 ,14 7 DP 796650 ,15 9 GF 570431 ,16 6 RD 064394
17 2 CN 461021 ,18 3 BA 991244 ,19 3 TT 876830 ,20 5 CB 698901 ,21 2 UD
204568 ,22 3 AT 399984 ,23 9 TR 158386 ,24 0 BN 619823
25 7 LT 756353 ,26 9 TP 068738 ,27 1NH 418262
सदर बंडल तयार करुन त्यावर सांगरुण असे पेन्सिलने लिहुन ती दोन्ही बंडल तक्रारदार यांच्या पॅन्टचे पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये अलगद ठेवले. त्यावेळी तक्रारदार यांना सुचना दिली की,वर नमुद लोकसेविका यांना लाच रक्कम देण्याची वेळ येत नाही तोपर्यंत त्यांनी सदर नोटांना हात लावु नये. तसेच लाच रक्कम उजव्या हाताने शर्ट व पॅन्टच्या खिशातुन काढुन द्यावी असे सांगितले. त्यानंतर अँथ्रासिन पावडर लावण्यासाठी वापरण्यात आलेला कापसाचा बोळा व कागद जाळून जागीच नष्ट करण्यात आला. त्यानंतर पोहवा1952/जाधव यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले.त्यानंतर आम्ही वरील दोन्ही पंच, तक्रारदार व सापळा पथकास सुचना दिल्या की,
1) लोकसेविका श्रीमती पाटील यांचेवर करण्यात येणा-या सापळा कारवाईच्या पथकामध्ये सपोआ माधुरी भोसले, पोनि शैलजा शिंदे, पोशि महामुलकर , मपोशि कोमल शेटे हे असतील.
2) लोकसेवक श्रीमती पारधी यांच्यावर करण्यात सापळा कारवाईच्या पथकामध्ये पोलीस निरीक्षक रुपेश जाधव,



Scanned with CamScanner

पोलीस हवालदार 1848 शेलार,मपोशि पुजा डेरे व पंच क्रं 2 हे असतील.
3) लोकसेवक श्रीमती पाटील यांचेवर करण्यात येणा-या सापळा कारवाईचे व्हिडीओ चित्रीकरण पोशि महामुनकर हे करतील.
4) सर्वप्रथम तक्रारदार, पंच क्रं 1, हे त्यांचे खाजगी चारचाकी वहानाने जातील त्यानंतर पोनि रुपेश जाधव व पोहवा शेलार असे पो.नि रुपेश जाधव यांचे दुचाकी वरुन तहसिल कार्यालय हवेली येथे पोहोचतील.
5) सपोआ माधुरी भोसले ,आम्ही मपोशि कोमल शेटे ,मपोशि पुजा डेरे , पुच क्र 2 असे शासकीय वाहनांने तहसिल कार्यालय हवेली कार्यालयात जावुन थांबतील.
6) पंच क्रं 2 हे कार्यालयासमोर मोकळ्या जागेमध्ये जावुन थांबतील.
7) दुस-या पथकातील पोलीस निरीक्षक श्री रुपेश जाधव ,पोहवा/शेलार ,मपोशि डेरे यांना दिसतील अशा रितीने थांबतील लोकसेवक श्रीमती पाटील यांचेवर करण्यात येणा-या सापळा कारवाईमध्ये सपोआ माधुरी भोसले ,आम्ही मपोशि कोमल शेटे , पोशि कैलास महामुनकर व पंच क्रं 1 हे असतील.
8) लोकसेवक श्रीमती पारधी यांचेविरुध्द केलेल्या सापळा कारवाईचे व्हिडीओ चित्रीकरण पोहवा/शेलार हे करतील.
9) तक्रारदार व पंच क्रं 1 हे लोकसेवक श्रीमती पाटील यांचेवर सापळा कारवाई करणारे पथक दिसल्यानंतरच लोकसेवक श्रीमती पाटील यांचे कार्यालयामध्ये जातील.
10) तक्रारदार व पंच क्र.01 यांनी लोकसेवक श्रीमती पाटील यांना त्यांचे कार्यालयात भेटुन त्यांचेशी कामाविषयी चर्चा करावी. सदर वेळी पंच नं.1 हे हजर राहून तक्रारदार व लोकसेवक यांच्यातील होणारे संभाषण लक्षपुर्वक ऐकावे.
11) तक्रारदार यांनी लोकसेवक श्रीमती पाटील यांच्या मागणीप्रमाणे शर्टच्या पुढील उजव्या खिशामध्ये अंॅथ्रासिन पावडर लावून ठेवलेली लाचेची रक्कम आपल्या उजव्या हाताने काढून ती त्यांचेकडे अगर त्यांनी लाच रक्कम इतर अन्य कोणा व्यक्तीस देण्यास सांगितल्यास त्याप्रमाणे ती द्यावी.
12) लोकसेवक श्रीमती पाटील यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार शिरसाट यांनी दोन्ही हाथ चोळुन चेह-यावरुन फिरवावे व लोकसेवक श्रीमती पाटील यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत इशारा करावा.
13) लोकसेवक श्रीमती पाटील यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा मिळताच सपोआ माधुरी भोसले, मपोशि कोमल शेटे , पोशि कैलास महामुनकर यांनी लोकसेवक श्रीमती पाटील यांना ताब्यात घ्यावे.सोबत पंच क्र 1 सापळा पथकासोबत थांबतील.
14) तक्रारदार यांनी श्रीमती पारधी यांना भेटण्याकरीता पंच क्रं 2 यांचेसह जावुन लोकसेवक श्रीमती पारधी यांना त्यांनी मागीतलेप्रमाणे लाच रक्कम दयावी.
15) पोनि रुपेश जाधव व त्यांचे पथकाने कोणासही संशय येणार तक्रारदार व पंच क्र 2 यांचेमागोमाग जावुन कोणासही दिसणार नाही अशा रितीने लोकसेवक श्रीमती पारधी हे थांबले असतील त्याठिकाणी सापळा लावुन थांबावे.
16) तक्रारदार यांनी लोकसेवक श्रीमती पारधी यांच्या मागणीप्रमाणे पॅन्टच्या पुढील उजव्या खिशामध्ये अंॅथ्रासिन पावडर लावून ठेवलेली श्रीमती.पासलकर व श्रीमती पारधी यांना देण्यासाठी ठेवलेले दोन बंडल लाचेची रक्कम आपल्या उजव्या हाताने काढून ती त्यांचेकडे अगर त्यांनी लाच रक्कम इतर अन्य कोणा व्यक्तीस देण्यास सांगितल्यास त्याप्रमाणे ती द्यावी.
17) लोकसेवक श्रीमती पारधी यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर तक्रारदार यांनी दोन्ही हाथ चोळुन गालांवरुन फिरवावे पथकास लाच स्विकारल्याचा इशारा दयावा.
18) लोकसेवक श्रीमती पारधी यांनी लाच रक्कम स्विकारताच त्यांना ताब्यात घेऊन तात्काळ तहसिल कार्यालय हवेली येथे लोकसेवक श्रीमती पाटील यांचे कार्यालयात घेऊन यावे.
19) लोकसेवक श्रीमती पारधी यांचेवर सापळा कारवाई झालेनंतर पोशि महामुलकर हे तात्काळ तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतील व सदर सापळा कारवाईचे व्हिडीओ चित्रीकरण करतील.
20) लाचेचा स्विकार झाल्यानंतर तक्रारदार यांनी कोणाशीही हस्तांदोलन करु नये.
21) लोकसेवक हे लाच घेतल्यानंतर पळून जाणार नाहीत याची दक्षता सापळा पथकाने घ्यावी.
22) आणखी काही परिस्थिती निर्माण झाल्यास तक्रारदार यांनी आम्हाला इशा-यानीशी सांगावे.
23) चहापानाची वेळ आल्यास लाच रक्कम वापरु नये.
त्यानंतर सापळा कारवाई तहसिल कार्यालय हवेली पुणे येथे जाऊन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही दिनांक 19/09/2025 रोजी वापरण्यात आलेले व्हाईस रेकॉर्डर व त्यामधील मेमरीकार्ड दाखवुन त्यामध्ये दिनांक 19/09/2025 रोजीचे पडताळणी कारवाईच्या अकारा (11) व दिनांक 23/09/2025 रोजीच्या दहा (10) दिनांक 24/09/2025 रोजीच्या तिन फाईल अशा एकुण 24 फाईल असून त्या व्यतिरिक्त इतर कोणतीही



Scanned with CamScanner

फाईल नसल्याची पंचाची व तक्रारदार यांची खात्री करुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री शिरसाट व पंच क्र. 01 श्री. संजय आसवले व पंच क्र.2 श्रीमती सुजाता कडु यांचे सापळा कारवाई करीताचे निवेदन व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरीकार्डमध्ये ध्वनिमुद्रीत केले. ती वेळ 17.31 वा.ची होती. त्यानंतर पोशि महामुलकर यांच्या मदतीने सदर व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार श्री शिरसाट यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस बनियानला सेफ्टी पिनचे सहाय्याने कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने लावला. ती वेळ 17.53 वा.ची होती. त्यानंतर तक्रारदार यांना पंच क्रं.1 श्री संजय आसवले यांचे सोबत लोकसेवक हे त्यांचे खाजगी वाहन क्रमांक किया कंपनीची चारचाकी वाहन क्र एमएच 12 यु जे 5013 मधुन तहसिलदार कार्यालय, हवेली, पुण्याच्या दिशेने 1)श्रीमती प्रेरणा पारधी 2) श्रीमती दिपाली पासलकर 3) श्रीमती.शारदादेवी पाटील यांना भेटण्याकरीता रवाना केले. त्यांचे पाठोपाठ पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधिक्षक श्रीमती माधुरी भोसले या त्यांच्या खाजगी दुचाकी वरुन रवाना झाल्या. तसेच पो.नि. रुपेश जाधव व पोहवा/1848 शेलार हे पोनि जाधव यांचे खाजगी दुचाकी क्र एमएच 11 बीजी 9327 यावरुन रवाना झालो. आम्ही ,उर्वरित पथक व पंच क्र 2 असे शासकीय वाहन क्र एमएच 12 युसी 4105 यामधुन रवाना होवून साधुवासवाणी चौकातुन– खडक पोलीस स्टेशन मार्गे तहसिल कार्यालय हवेली पुणे येथे पोहचलो. तसेच रस्त्याचे बाजुला वाहन थांबवून आम्ही सर्व वाहनातुन उतरलो. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र 1 असे पायी चालत त्यांचे मागोमाग एकमेकांमध्ये अंतर ठेवुन आम्ही पथक व पंच क्र 2 असे तहसिल कार्यालय हवेली,पुणे येथे वर नमुद लोकसेविका काम करण्यास बसतात त्या ठिकाणी पोहचलो. तक्रारदार व पंच क्र 1 असे लोकसेविका 1) श्रीमती प्रेरणा पारधी 2) श्रीमती दिपाली पासलकर या काम करत बसलेल्या कार्यालयात गेले. कार्यालयाच्या बाहेर आम्ही व पथक व पंच क्र2 असे कोणास संशय येणार नाही अश्या रितीने एकमेकांपासुन अंतर ठेवुन थांबलो. काही वेळाने कार्यालयातुन दोन महिला या तक्रारदार यांचेशी बोलुन तेथुन पत्र्याचे कंम्पांउडच्या गेटच्या बाहेर गेल्या. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र 1 हे एका साडी परीधान केलेल्या महीलेसोबत बोलत बोलत बाहेर आले. त्यांचे पाठोपाठ आम्ही सापळा पथक व पंच 2 तक्रारदार व सदर महीला यांचे पाठोपाठ कार्यालयातुन बाहेर पडुन कार्यालयाचे बाहेर असलेल्या पत्र्याच्या कंम्पांउडच्या बाहेर गेलो. त्यावेळी तक्रारदार हे त्या साडी परीधान केलेल्या महीलेबरोबर बोलत कंम्पांउडला लागुन दुचाकी पार्क केलेल्या ठिकाणी बोलत होते. त्यावेळी दोन ड्रेस घातलेल्या महीला एका स्कुटी दुचाकीवरुन जाताना दिसल्या. आम्ही उर्वरित पथक व पंच क्र 2 असे तेथे विखरुन तक्रारदार यांचे इशा- याची वाट पहात थांबलो. काही वेळाने तक्रारदार यांनी आमचेकडे बघुन साडी परीधान केलेल्या महिलेने लाच रक्कम स्विकारलेबाबत इशारा केला. लगेचच तेथे थोडया अंतरावर उभ्या असलेल्या मा.पोलीस उपअधीक्षक श्रीमती भोसले ,मपोशि/कोमल शेटे,मपोशि/पुजा डेरे व आम्ही नमुद महिलेस जवळ जावुन नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव शारदादेवी पाटील,तलाठी खडकवाडी - कुडजे असे सांगीतले. त्यावेळी महीला पोशि/शेटे यांनी नमुद लोकसेवक यांचा डावा हात मनगटाजवळ पकडला आणि मा.पोलीस उपअधीक्षक श्रीमती भोसले यांनी उजवा हात मनगटा जवळ पकडला सदरची वेळ 19/15 वा ची होती. त्यावेळी आम्ही आमचे ओळखपत्र दाखवुन आणि पथकाची ओळख सांगुन लोकसेवक श्रीमती पाटील यांना त्यांचेवर झालेल्या सापळा कारवाईविषयी माहीती दिली. त्यांना शेजारील असणा-या आडोशाला घेऊन गेलो. तेथे गेल्यावर दिलेल्या पुर्वनियोजीत सुचनेनुसार पो.शि.9843 महामुलकर यांनी त्यांचेजवळील सॅमसंग कंपनीच्या ए 33 5जी मोबाईलमध्ये सॅनडिस्क अल्ट्रा कंपनीचे 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी. यु.1 एक्स.सी. आय सी. 10 ए 1 कार्ड त्याचेमागील बाजुस 4525XF1822X4 BM MADE IN CHINA हे नविन मेमरीकार्ड टाकलेल्या मोबाईलमध्ये व्हिडीओ रेकॉर्डीग सुरु केले. त्यावेळी सदर ठिकाणी असलेल्या तक्रारदार यांना श्रीमती पाटील यांनी स्विकारलेली लाच रक्कम कोठे ठेवली आहे, याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी श्रीमती पाटील यांनी डाव्या हाताने लाच रक्कम स्विकारुन दोन्ही हाताने मोजुन त्याचेकडे असलेल्या चॉकलेटी रंगाच्या हॅन्डबॅगमधील पुढील बाजुकडील चैन असलेल्या दुस-या कप्प्यामध्ये ठेवली असल्याचे सांगीतले. पो.उप.अधि.श्रीमती माधुरी भोसले, आम्ही व पंच क्र 1 श्री संजय आसवले यांना लोकसेवक श्रीमती पाटील यांचे बॅगमध्ये ठेवलेली लाच रक्कम पहाण्यास सांगीतले असता त्यांनी लोकसेवक यांची बॅग पाहीली असता त्यामध्ये 2000/- रुपये लाच रक्कम दिसुन आली. सदर रक्कम काढुन सापळापुर्व कार्यवाही दरम्यान नोटांचे नंबर लिहलेला कागद काढुन त्यावर नोंद करण्यात आलेले नंबर आणि नोटांवर असलेले नंबर तपासुन पाहीले असता एकच असल्याचे दिसुन आले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार पंच क्र 1 यांनी सदर लाच रक्कम त्यांचे ताब्यात ठेवली. आम्ही आमच्याकडील अल्ट्रव्हायलेट दिव्याचा प्रकाश सदर नोटांववर तसेच श्रीमती पाटील यांचे हातावर प्रकाश टाकला असता दोन्ही हाताच्या बोटांच्या पेरास व तळहातास अॅन्थ्रसिन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर आम्ही लोकसेवक श्रीमती पाटील यांचे बॅगेवर अल्ट्रव्हायलेट दिव्याचा प्रकाश टाकला असता बॅगेच्या कडांना आणि पुढील बाजुस असलेल्या चैनिच्या कप्याच्या आतील बाजुस अॅन्थ्रसिन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर आमचे सुचनेनुसार पोशि महामुलकर यांनी व्हिडीओ



Scanned with CamScanner

शुटींग बंद केली त्यावेळी 19/26 वाजले होते. लोकसेवक श्रीमती पाटील याने स्विकारलेल्या लाच रक्कम तसेच श्रीमती पाटील यांनी स्विकारलेली लाच रक्कम ठेवलेली हॅन्ड बॅग पंच क्र 1 यांना ताब्यात ठेवण्याच्या सुचना देण्यात आल्या. त्याप्रमाणे सदर बॅग पंच क्र.1 श्री संजय आसवले यांनी त्यांच्या ताब्यात ठेवली. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र 2 आणि त्यांचे पाठोपाठ पोनि जाधव ,पोहवा/शेलार,मपोशि/डेरे असे सदर ठिकाणाहुन निघुन गेले. त्यानंतर लोकसेवक श्रीमती पाटील यांची दुचाकी याची झडती घेण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले आम्ही लोकसेवक श्रीमती पाटील यांना त्यांची दुचाकी दाखवण्यास सांगीतली त्यांनी त्याची दुचाकी दाखवली ती पाहीली असता ज्युपीटर वाहन क्र एम एच 39एई 6572 रंग ग्रे अशी दिसुन आली. आम्ही दिलेल्या सुचनेनुसार पोशि महामुनकर यांनी मोबाईल मधील व्हिडीओ शुटींग चालु केली ती वेळ 19/31 वा.ची होती. आम्ही गाडीच्या डिक्कीची झडती घेतली असता कार्यवाहीच्या अनुशंगाने आवश्यक असणारी कागदपत्रे मिळुन आली नाही. त्यानंतर व्हिडीओ शुटींग बंद करण्यात आली त्यावेळी 19/33 वाजले होते.

त्यानंतर लोकसेविका श्रीमती शारदादेवी पाटील यांना ला.प्र.वि कार्यालय पुणे येथे हजर राहणे बाबत पत्र देण्यात येणार आहे, असे सांगीतले काही वेळाने आम्ही थांबलेल्या ठिकाणी पोनि जाधव,पोहवा / शेलार,मपोशि डेरे,पंच क्र 2 व तक्रारदार त्यांचे खाजगी वाहनांतुन आले. त्यावेळी आम्ही पोनि जाधव यांच्याकडे लोकसेविका पारधी व पासलकर यांचेबाबत विचारणा केली असता तक्रारदाराने लोकसेवक पारधी व पासलकर यांना फोन केला असता त्यांनी फोन उचलला नसल्याचे सांगितले. तक्रारदार यांनी तेथे आजुबाजुला लोकसेवक यांचा शोध घेतला असता, त्या दिसुन आल्या नाहीत. त्याबाबत त्यांनी इशा-याने सांगीतले असता पोहवा/शेलार यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन घेवुन बंद केलाती वेळ 19/50 वा ची होती. सदर ठिकाणी तक्रारदार यांचे वाहनात तक्रादाराच्या हातांवर अल्ट्राव्हॉयलट दिव्याचा प्रकाश टाकला असता त्यांचे उजव्या हाताच्या बोटाच्या पेरास निळसर चकाकी दिसुन आली.तसेच तक्रारदारयांच्या शर्टच्या खिशावर अल्ट्राव्हॉयलट दिव्याचा प्रकाश टाकला असता निळसर चकाकी दिसुन आली.त्यानंतर आम्ही सदर ठिकाणच्या चर्तुःसिमा घेवून नकाशा काढला. त्यानंतर आरोपी लोकसेविका श्रीमती शारदादेवी पाटील यांना शासकीय वाहनातुन पंच क्र.1 व म.पो.शि.कोमल शेटे व पो.शि.महामुलकंर यांचेसह ला.प्र.वि.कार्यालयात नेण्यात आले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा केली असता, त्यांनी सांगीतले की,पाषाण तलाठी कार्यालयाचे बाजुला श्रीमती पारधी या रहात असुन सदर ठिकाणी जावुन पारधी यांना कॉल करतो आणि त्यांना भेटतो. त्यावेळी सर्वानुमते सदर ठिकाणी जावुन तक्रारदार यांचे मोबाईलवरुन श्रीमती पारधी यांना फोन करावा आणि त्यांनी भेटण्यास बोलवल्यास त्यांना भेटुन त्यांनी मागणी केलेली लाच रक्कम दयावीअशी सुचना देण्या आली त्यावेळी त्यांचेसोबत इतर सापळा पथक व पंच क्र.2 हे सोबत राहतील असे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे वाहानातुन संभाजी चौक पाषाण पुणे येथे तक्रारदार यांचे वहानातुन पोहचलो. काही वेळाने तक्रारदार यांनी श्रीमती पारधी यांचे मोबाईलवर संपर्क साधला असता त्यांनी फोन उचलला नाही.सदरचा कॉल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आला ती वेळ 21/05 वा चे होती.आम्ही तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, लोकसेवक श्रीमती पारधी या फोन उचलला नाही. लोकसेविका पारधी व पासलकर यांना तक्रारदार यांची शंका आल्याने त्या आता लाच रक्कम स्वीकारणार नाहीत असे तक्रारदार यांनी सागितले. त्यामुळे सदर सापळा कारवाई ही संपविण्यात आली. तक्रारदार यांना लावण्यात आलेला व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला व उर्वरीत सर्व सापळा पथक पुढील कारवाई करीता ला.प्र.वि. कार्यालय पुणे येथे आले.

तरी 1) श्रीमती प्रेरणा विनंदकुमार पारधी, पद – तलाठी, सांगरुन हस्तलिखीत 7/12 च्या 1992 ते 2015 असे एकुण सात बा-याच्या 240 प्रती देण्याकरीता शासकीय फी 3600/- रुपये होत असताना यापुर्वी 4000/- रुपये स्विकारले असुन उर्वरीत शासकीय फी व्यतिरीक्त रुपये 16,400/- रक्कमेची मागणी केली आहे. तसेच 2) श्रीमती दिपाली पासलकर पद – तलाठी बहुली, ता.हवेली जि.पुणे. यांनी बहुली रिंगरोड जमिनीच्या 7/12, 8अ व फेरफार उता-याच्या 106 सांक्षाकीत नक्कला प्रतींचे शासकीय फी सरकारी फी व्यतिरीक्त 4910/- रुपये अशी लाच मागणी करुन सदरची लाच रक्कम ही पासलकर मॅडम यांनी फोनद्वारे पारधी मॅडम यांचेकडे देण्याबाबत सांगितले आहे आणि 3) श्रीमती शारदादेवी पुरुषोत्तम पाटील पद – तलाठी कुडजे, ता.हवेली जिल्हा पुणे. यांनी खडकवाडी कुडजे या गावच्या 7/12 उतार्‍याच्या हस्तलिखीत 32 गटांच्या प्रती देण्याकरीता शासकीय फी व्यतिरीक्त 1520/- रुपयांची लाच मागणी केली असुन दि.25/09/2025 रोजी 19/15 वा चे दरम्यान लोकसेवक श्रीमती पाटील तक्रारदार यांचेकडे मागणी केलेली शासकीय फी सहीत 2000/- रुपये लाच रक्कम तहसिल कार्यालय हवेली,पुणे येथील पाठीमागील बाजुकडील गेटचेबाहेर दुचाकी पार्कींग केलेल्या ठिकाणी पंचासमक्ष स्विकारली त्यामुळे माझी लोकसेवक 1) श्रीमती.शारदादेवी पाटील तलाठी –कुडजे 2)श्रीमती प्रेरणा पारधी तलाठी -सांगरुन 3) श्रीमती



Scanned with CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

दिपाली पासलकर तलाठी -बहुली यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 कलम 7 प्रमाणे कायदेशीर तक्रार आहे.
माझा वरील जबाब मी वाचुन पाहीला असून, तो माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून, तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष हा जबाब लिहुन दिला स.ता.म.

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

shashikant bharat chavan(I (Inspector)) / DGPSBCM7202 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

ठाणे अंमलदार
खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर



Scanned with CamScanner

Name (नाव): shashikant bharat cl
Rank(पद): [illegible] (Inspector)
No.(नं.): DGPSBCM7202

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with CamScanner